आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी **07** वाजून **10** मि

दिनांकः**28.05.2024** वारःमंगळवार

---

- राज्य शिक्षण मंडळानं दहावीच्या परीक्षेत सुमारे ९६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण, **187** विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण
- राज्यात विविध ठिकाणी लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या तयारीला वेग
- कल्याणीनगर अपघात प्रकरणी ससून रुग्णालयातल्या दोन डॉक्टर्ससह तिघांना अटक; **30** मेपर्यंत पोलिस कोठडी
- मान्सूनबाबत हवामान विभागाचा सुधारित अंदाज जाहीर; यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा काहीशा जास्त पावसाची शक्यता

दहावीचा निका

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं यावर्षी मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल मंडळानं काल जाहीर केला. यंदा या नियमित परीक्षेत **95** पूर्णांक **81** टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ऐकुयात आधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

दहावीच्या नियमित परीक्षेसाठी यंदा राज्यातील नऊ विभागीय मंडळातून **15** लाख **49** हजार **326** नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी **14** लाख **84** हजार **441** जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा यंदा **1** पूर्णांक **98** टक्क्यांनी निकाल वाढला आहे. यावर्षीही मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी **97** पूर्णांक **21** टक्के इतकी आहे. तर **94** पूर्णांक **56** टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. यंदाही कोकण विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी सर्वाधिक असून यात **99** पूर्णांक **1** टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर सर्वात कमी निकाल हा नागपूर विभागाचा असून त्याची टक्केवारी **94** पूर्णांक **73** टक्के इतकी आहे. पुणे विभागाचा निकाल **96** पूर्णांक **44** टक्के इतका आहे. **72** पैकी **18** विषयांचा निकाल **100** टक्के आहे. तर **187** विद्यार्थ्यांना प्रत्येकी **100** टक्के गुण मिळाले आहेत, या निकालाचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे मंडळाच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात पहिल्यांदाच दहावीचा निकाल मे महिन्यात जाहीर झाला आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले पुणे

दरम्यान, दहावीच्या निकालानंतर काही विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य किंवा मानसिक दडपणातून नकारात्मक भावना वाढीस लागण्याची शक्यता लक्षात घेऊन मंडळातर्फे समुपदेशनाची सुविधा सुरू ठेवण्यात आली आहे. पुढचे आठ दिवस ही सुविधा सुरू राहणार असून यासाठीचे दूरध्वनी क्रमांक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

राष्ट्रवादी बैठक

निवडणूक ही कार्यकर्त्यांची परीक्षा असून निवडणुकीच्या विजयाचा कोणीही उन्माद करू नये आणि पराभवानं खचूनही जाऊ नये असा सल्ला देत; आता विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करा, असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी पक्षाच्या बैठकीत काल मुंबईत केलं. कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो, त्याला जपलं गेलं पाहिजे, असं पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यातले प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या बैठकीत ते बोलत होते. येत्या **10** जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा रौप्य महोत्सवी वर्धापनदिन आहे. या निमित्तानं प्रत्येक जिल्ह्यात विविध कार्यक्रम राबवावेत. छत्रपती शिवाजी महाराज-फुले-शाहू-आंबेडकरांची विचारधारा ही आपल्या पक्षाचा मूळ गाभा असून कितीही मोठी किंमत मोजावी लागली तरी आम्ही ही विचारधारा सोडणार नाही, अशी भूमिका अजित पवार यांनी स्पष्ट केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय दर्जा आपल्याला परत मिळवायचा आहे, असा निर्धार प्रफुल पटेल यांनी व्यक्त केला.

पदवीधर निवडणूक

विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं अभिजित पानसे यांना उमेदवारी दिली आहे. मनसे नेते आणि सरचिटणीस शिरीष सावंत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही महिती दिली आहे.

मतमोजणीतयारी

लोकसभा निवडणूक विविध टप्प्यात पार पडत असून निवडणूकीच्या शेवटच्या टप्प्यात येत्या **1** जून रोजी मतदान होणार आहे. मतमोजणी **4** जून रोजी होणार असून आता सर्वत्र मतमोजणीची तयारी सुरू झाली आहे.

सांगली लोकसभा मतदारसंघात **7** मे रोजी झालेल्या मतदानाची मतमोजणी मिरजेत वेअर हाऊसिंग कॉर्पोरेशन इथं होणार आहे. मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी सुरु असलेलं कामकाज आणि व्यवस्थेची जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी काल पाहणी केली. मतमोजणी केंद्राच्या ठिकाणी आवश्यक त्या सेवा सुविधांबाबत संबंधितांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

धुळे लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी शासकीय धान्य गोदाम, नगावबारी, देवपूर इथं होणार आहे. मतमोजणीची प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी मतमोजणीकरीता नियुक्त नोडल अधिकाऱ्यांनी समन्वय साधून काम करण्याच्या

सूचना धुळ्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या. धुळे लोकसभा मतदार संघ मतमोजणीच्या पूर्वतयारी आढावा बैठकीत ते काल बोलत होते.

सावरकर जयंती

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची आज जयंती आहे. यानिमित्त राज्यभरात अनेक संस्था संघटनांच्यावतीनं अभिवादनपर कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला काल पुण्यात व्याख्यान, नाट्यगीत गायन, अभिवाचन अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून त्यांना अभिवादन करण्यात आलं.

विज्ञान विदुषी

विज्ञान विदुषी **2024 –** भौतिकशास्त्र या कार्यक्रमाचं काल मुंबईत उद्घाटन करण्यात आलं. टाटा मुलभूत संशोधन संस्था आणि होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र यांच्याद्वारे हा तीन आठवड्यांचा निवासी कार्यक्रम घेतला जातो. विज्ञान क्षेत्रामध्ये विशेषतः भौतिक शास्त्रामध्ये महिलांची संख्या खूप कमी असते. ही परिस्थिती बदलण्यासाठी वैज्ञानिक महिलांकडून विद्यार्थिनींना मार्गदर्शन देणारा हा कार्यक्रम असून या वर्षी या कार्यक्रमासाठी देशभरातून **46** विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे.

कल्याणीनगर अपघात

पुण्यातील कल्याणी नगर अपघात प्रकरणी पुणे पोलिसांनी ससून रुग्णालयातले अजय तावरे आणि श्रीहरी हरनोल, हे दोन डॉक्टर आणि अतुल घटकांबळे या कर्मचाऱ्याला अटक केली आहे. अल्पवयीन मुलाच्या रक्त नमुन्याच्या चाचणी अहवालात फेरफार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या तिघांना काल न्यायालयात हजर करण्यात आलं. तिघांनाही **30** मे पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत.

दरम्यान या प्रकरणी ससून रूग्णालयात झालेल्या गैरप्रकारचा तपास करण्यासाठी राज्य सरकारनं तीन सदस्यांची चौकशी समिती स्थापन केली आहे.

या प्रकरणाचा तपास सध्या गुन्हे शाखा करत आहे.

कल्याणी नगर इथल्या अपघात प्रकरणी काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी काल पुणे शहरातल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयावर मोर्चा काढला. या दोघांनी उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांना निवेदन दिलं.

अंमली पदार्थ-

रत्नागिरी जिल्ह्यात येत्या शैक्षणिक वर्षात सर्व प्रांताधिकारी आणि शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळा-महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थांविरोधात मोठ्या प्रमाणात जागृती करावी, अशी सूचना रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिली आहे. त्यासाठी विविध यंत्रणांचं सहकार्य घ्यावं, असंही ते म्हणाले. या संदर्भातील एका बैठकीत ते काल बोलत होते. जनजागृतीसाठी पोलीस विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या छोट्या चित्रफितींचा प्रसार सर्वत्र करावा, असं जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी सांगितलं.

सैन्यभरती

भारतीय सैन्यदल, नौदल आणि हवाईदलामध्ये अधिकारी पदावर भरतीसाठी होणाऱ्या कंम्बाइंड डिफेन्स सर्व्हीसेस अर्थात सीडीएस परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातल्या पात्र उमेदवारांकरिता छात्रपूर्व प्रशिक्षण नाशिक रोड इथं **10** जून ते **23** ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आलं आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेल्या पदवीधर उमेदवारांनी **4** जून पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय इथं मुलाखतीसाठी हजर राहण्याचं आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून करण्यात आलं आहे.

बिबट्या

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापूर तालुक्यात पळसून परिसरात वावर असलेल्या बिबट्या मादीला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आलं आहे. या बिबट्या मादीनं आपल्या दोन पिलांसह परिसरात गाई, शेळ्यांसह एका दुचाकीस्वारावर हल्ला चढवला होता. परिसरात पिंजरा लावून बिबट्या मादीला पकडल्यानंतर तिची पिल्लेही सापडली.

विद्युत मंडळ स्पर्धा

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या **45**व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती आणि टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा पुण्यात उद्यापासून सुरू होत आहेत. गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, उत्तराखंड, पंजाब, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेशातील तसंच इतर खासगी अशा **14** वीज कंपन्यांचे **21** संघ आणि सुमारे **350** खेळाडू या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

पाऊस

राज्यात गेल्या दोन दिवसात वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी नुकसान झालं आहे. धाराशिव इथं वादळी वाऱ्यामुळे एकाचा मृत्यू झाला आहे. तर, जळगाव जिल्ह्यात यावल तालुक्यातील थोरपणी इथं वादळामुळे घर कोसळून एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त संस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात काल झालेल्या पावसामुळे एक हजार हून अधिक शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालं. वीज पडून दोघांचा मृत्यू झाला असून **14** जनावरंही दगावली. फळबागा आणि केळी बांगाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

सांगली जिल्ह्याच्या पूर्व भागातही रविवारी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला.

हवामान अंदाज

हवामान विभागानं यंदाच्या मान्सूनबाबत सुधारित दीर्घकालीन अंदाज काल जाहीर केला. त्यानुसार देशभरात यंदा जून ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या चार महिन्यात सरासरीपेक्षा काहीसा जास्त पाऊस अपेक्षित आहे. या कालावधीत **106** टक्के पाऊस पडेल; यात चार टक्क्यांची तफावत असू शकते असं हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितलं.

जून महिन्यात देशभरात सामान्य पाऊसमान असेल, तसंच येत्या पाच दिवसांत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याच्या दृष्टीनं अनुकूल हवामान असल्याचंही या अंदाजात नमूद केलं आहे.

दरम्यान येत्या **24** तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज असून विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.